*सॅनिटायझर तसेच मास्कवरील जीएसटी माफ करण्याबाबत सकारात्मक कार्यवाहीचे श्रीमती निर्मला सितारमन यांचे सुधीर मुनगंटीवार यांना आश्वासन*
=====================================================================

कोरोना विषाणू च्या वाढत्या प्रादुर्भावाशी लढताना देशात सॅनिटायझर तसेच मास्क ची मागणी वाढत आहे किंबहूना ती या प्रक्रियेत आत्यांतिक गरज झाली आहे. ही बाब लक्षात घेता सॅनिटायझर तसेच मास्कवरील जीएसटी माफ करण्याची मागणी माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि देशाच्या अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमन यांच्याकडे केली .
आज या मागणी संदर्भात आ. मुनगंटीवार यांनी श्रीमती निर्मला सीतारमन यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली . तसेच प्रधानमंत्री कार्यालयात श्री संजय भावसार यांच्याशी चर्चा केली. श्रीमती निर्मला सीतारमन यांनी याबाबत सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले. श्री संजय भावसार यांनीही याबाबत पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांना अवगत करण्यात येईल असे सांगितले . श्रीमती निर्मला सीतारमन यांच्याशी झालेल्या चर्चेत आयकर रिटर्न्स तसेच जिएसटी रिटर्न्स आदींचा भरणा करण्यासाठी विहित मुदतीत महिनाभर वाढ करण्याच्या मागणी कडे सुद्धा त्यांनी लक्ष वेधले . याबाबत सुद्धा त्यांनी सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले.